# "ऑनलाईन शिक्षण पद्धती ही विद्यार्थ्यांना मिळालेली एक संधी की आव्हान"

**डॉ. भाग्यश्री दिनेश पाटील**
सहाय्यक प्राध्यापक,
श्री.शि.वि.प्र. संस्थेचे कला आणि वाणिज्य महाविद्यालय धुळे
bhagyashripatil759@gmail.com ,
Mob.No.9764287436

**प्रस्तावना-**

जगामध्ये मनुष्याने अनेक रोगांचा सामना केला आहे. पण आज संपूर्ण जगात एका अशा विषाणूने थैमान घातले की ज्यामुळे संपूर्ण जगाची झोप उडाली आहे. लोकांच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे सर्वांचे जीवन जगणे कठीण बनले आहे. या वायरस च नाव आहे कोरोना व्हायरस.

covid-19 करोना व्हायरस हा असा विषाणू आहे जो आपल्याला डोळ्यांनी दिसु शकत नाही. हा एक अतिसूक्ष्म विषाणू आहे. ज्याला या आधी कधी पाहिलं गेलं नव्हतं सर्वात प्रथम या विषाणूचा संसर्ग डिसेंबर 2019 चीन मधील वुहान या शहरात झाला. त्यानंतर या विषाणूचे नाव कोरोनाव्हायरस ठेवण्यात आले. करोना विषाणूच्या संसर्गामुळे या रोगाची लागण होते. त्या रोगाचे नाव covid-19 ठेवण्यात आले. हा विषाणू खूप घातक आहे या विषाणूमुळे संपूर्ण दुनियेतील अनेक लोकांना याची बाधा झाली आहे आणि लाखाहून अधिक लोकांना जीव गमवावा लागला आहे. covid-19 हा संसर्गजन्य रोग असून त्याची लागण झाल्यास कोणी स्पर्श केला, त्या व्यक्तीच्या संपर्कात आले तरीदेखील त्या व्यक्तीस ही कोरोनाची बाधा होते. हा व्हायरस पसरून जवळपास एक वर्षाहून अधिक कालावधी झाला आहे. व्हायरसचा प्रसार रोखणे कठीण बनले आहे.

कोरोनाव्हायरस विरुद्ध लढण्यासाठी रात्रंदिवस पोलीस, सैनिक, डॉक्टर, नर्स, सफाई कर्मचारी, जनसेवक प्रयत्न करत आहेत. खरोखरच आपणास या रोगाला संपवायचे असेल तर लॉकडाउन हा शेवटचा पर्याय आहे. संपूर्ण जगासमोर निर्माण झालेला प्रश्न सोडविण्यासाठी आणि संपूर्ण जगात लॉकडाउन करण्याची वेळ आली. लॉकडाउन चा अर्थ संपूर्ण व्यवहार जे काय आहे ते बंद करण्यात आले यामध्ये सामाजिक, राजकीय, शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रांमध्ये चालणारे दररोजचे व्यवहार, देवाण-घेवाण, व्यक्ती व्यक्ती मधील संपर्क हा थांबविण्यात आला आणि याचाच परिणाम हा शैक्षणिक क्षेत्रावर सुद्धा घडून आलेला दिसत आहे.

सर्व शाळा, महाविद्यालय बंद करण्यात आले आणि शिक्षणाचा प्रवाह विद्यार्थ्यांपर्यंत सतत पोहोचत राहावा यासाठी ऑनलाईन शिक्षणपद्धती या पद्धतीचा सर्वत्र अवलंब केला गेला आणि याच पद्धतीचा वापर भारतात लॉकडाउन केले असता मोठ्या प्रमाणावर ऑनलाइन शिक्षणाची सुविधा निर्माण करण्यात आली. या ऑनलाईन शिक्षण पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांची भूमिका काय आहे, विद्यार्थ्यांचं मत काय आहे हे जाणून घेण्यासाठी या संशोधन विषयाचा अभ्यास करण्यात आलेला आहे

**उद्देश =**

1. ऑनलाईन शिक्षण पद्धती हे शिकण्याचे प्रभावी माध्यम आहे याचा अभ्यास करणे.
2. ऑनलाइन शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्व शंकांचे पूर्णतः निरसन होते का याचा अभ्यास करणे.
3. ऑनलाइन शिक्षणामध्ये विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील संवाद पुरेसा आहे का याचा अभ्यास करणे.
4. ऑनलाइन शिक्षणामध्ये विद्यार्थी अधिक क्रियाशील आणि स्व-अध्ययन करण्यास प्रवृत्त झाला आहे का याचा अभ्यास करणे.

**गृहीत कृत्य =**

1. ऑनलाईन शिक्षण पद्धती हे शिक्षणाचे प्रभावी माध्यम आहे.
2. ऑनलाइन शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्व शंकांचे पूर्णतः निरसन होत नाही.
3. ऑनलाइन शिक्षणामध्ये विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील संवाद पुरेसा नाही.
4. ऑनलाइन शिक्षणामध्ये विद्यार्थी अधिक क्रियाशील आणि स्व-अध्ययन करण्यास प्रवृत्त झाला आहे.

**नमुना निवड =**

महाविद्यालयात प्रवेशित असणाऱ्या पदवी व पदव्युत्तर वर्गातील एकुण विद्यार्थी संख्या 740 असून त्यापैकी 50 टक्के म्हणजे 370 विद्यार्थ्यांची नमुना म्हणून निवड करण्यात आली आहे.

**क्षेत्र, कालावधी व व्याप्ती** =

संशोधन विषयाचे क्षेत्र म्हणून महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्यातील शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे कला आणि वाणिज्य महाविद्यालय धुळे याची निवड करण्यात आली आहे. संशोधनाचा कालावधी हा साधारणपणे मार्च 2020 ते मार्च 2021 हा निश्चित करण्यात आला आहे.

**माहिती मिळविण्याचे साधन=**

संशोधन विषया संदर्भात विद्यार्थ्यांकडून माहिती व अभिप्राय मिळविण्यासाठी प्रश्नावली तयार करण्यात आली आहे व या प्रश्नावलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांकडून ऑनलाइन पद्धतीने माहिती मिळविण्यात आली ,प्रश्नावली भरून घेण्यात आली.

**संशोधनाची मर्यादा =**

या संशोधन विषयात फक्त एस एस वी पी एस महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**स्पष्टीकरण =**

“ऑनलाइन शिक्षण पद्धती ही विद्यार्थ्यांना मिळालेली एक संधी की आव्हान” या विषयासंदर्भात महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर वर्गाच्या विद्यार्थ्यांकडून प्रश्नावली भरून घेण्यात आली. या विद्यार्थ्यांनी आपली मते नोंदवली असून ती पुढीलप्रमाणे आहेत.

1. ऑनलाईन शिक्षण पद्धती हे शिकण्याचे प्रभावी माध्यम आहे.

| | सहमत | असहमत | तटस्थ | एकूण |
|---|---|---|---|---|
| विद्यार्थी संख्या | 228 | 94 | 48 | 370 |
| शेकडा प्रमाण | 61.6 | 25.4 | 13.00 | 100 |

ऑनलाईन शिक्षण पद्धती हे शिकण्याचे प्रभावी माध्यम आहे असा प्रश्न विद्यार्थ्यांना विचारला असता 61.6% विद्यार्थ्यांनी आपली सहमती दर्शवली आहे. भूमिका 25.4% विद्यार्थ्यांनी ऑनलाईन शिक्षणाबद्दल असहमती दर्शविली आहे. आणि 13.00% विद्यार्थी यापासून तटस्थ भूमिका दर्शवितात.

2. ऑनलाइन शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्व शंकांचे पूर्णतः हा निरसन होते.

| | सहमत | असहमत | तटस्थ | एकूण |
|---|---|---|---|---|
| विद्यार्थी संख्या | 131 | 161 | 78 | 370 |
| शेकडा प्रमाण | 33.4 | 43.5 | 21.1 | 100 |

ऑनलाइन शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्व शंकांचे पूर्णतः हा निरसन होते असा प्रश्न विद्यार्थ्यांना विचारला असता, एकूण नमुन्यांपैकी 33.4% विद्यार्थ्यांनी आपली सहमती दर्शविली आहे, तर 43.5 टक्के विद्यार्थ्यांनी आपली असहमती दर्शविली असून 21.1 टक्के विद्यार्थी या प्रश्नाबद्दल आपली तटस्थ भूमिका दर्शवितात.

3. ऑनलाइन शिक्षणामध्ये विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील संवाद पुरेसा आहे.

| | सहमत | असहमत | तटस्थ | एकूण |
|---|---|---|---|---|
| विद्यार्थी संख्या | 167 | 132 | 71 | 370 |
| शेकडा प्रमाण | 45.1 | 35.7 | 19.2 | 100 |

ऑनलाइन शिक्षणामध्ये विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील संवाद पुरेसा आहे असा प्रश्न विद्यार्थ्यांना विचारला असता एकूण नमुन्याच्या 45.1% या मताशी सहमत असून, 35.7% विद्यार्थी असहमत आहेत तर 19.2 टक्के विद्यार्थी हे तटस्थ आहेत.

4. ऑनलाइन शिक्षणामध्ये विद्यार्थी अधिक क्रियाशील आणि स्व-अध्ययन करण्यास प्रवृत्त झाला आहे.

| | सहमत | असहमत | तटस्थ | एकूण |
|---|---|---|---|---|
| विद्यार्थी संख्या | 187 | 111 | 72 | 370 |
| शेकडा प्रमाण | 50.50 | 29.7 | 19.7 | 100 |

ऑनलाइन शिक्षणामध्ये विद्यार्थी अधिक क्रियाशील आणि स्व-अध्ययन करण्यास प्रवृत्त झाला आहे. असा प्रश्न विचारला असता एकूण नमुन्याच्या संख्येपैकी 50.50 टक्के विद्यार्थी या मताशी सहमत असून 29.7 टक्के विद्यार्थी यामताशी असहमत आहेत तर 19.7 टक्के विद्यार्थ्यांनी आपली त्रयस्थ तटस्थ अशी भूमिका दर्शविली आहे.

**निष्कर्ष=**

1. ऑनलाईन शिक्षण पद्धती ही शिकण्याचे प्रभावी माध्यम आहे असे अनेक विद्यार्थ्यांना वाटते यामध्ये त्यांना शिक्षण घेण्यासाठी कोणत्याही वेळेचे ,ठिकाणाचे बंधन नाही तसेच ऑनलाईन शिक्षण पद्धतीत अनेक घटना किंवा संकल्पना यांबाबत प्रत्यक्ष अनुभव हे चित्र रूपात अनुभवता येतात त्याचा अधिक प्रभाव हा पडताना दिसून येतो.
2. ऑनलाईन शिक्षण पद्धतीत विद्यार्थ्यांच्या सर्व शंकांचे निरसन होते याच्याशी विद्यार्थी वर्ग मोठ्या प्रमाणावर असहमत आहे. अनेक प्रश्न शंका या विद्यार्थ्यांच्या मनात राहून जातात ऑनलाईन शिक्षण पद्धतीमध्ये प्रत्येक शंकेची विचारणा करता येत नाही त्यावर बंधने येत असतात.
3. ऑनलाईन शिक्षण पद्धतीमध्ये शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये असणारा संवाद हा अत्यंत महत्त्वाचा आहे आणि यामध्ये तो संवाद घडून येण्यास पुरेसा वेळ मिळत नाही किंवा संधी उपलब्ध होत नाही त्यामुळे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील नाते हे वेळेच्या बंधनात अडकून राहते.
4. ऑनलाईन शिक्षण पद्धतीमध्ये अनेक प्रकारची साधने ,यांत्रिक साधने वापरण्याची संधी ही विद्यार्थ्याला मिळाली आहे. त्यामुळे वेगवेगळ्या प्रकारचे माहितीचे स्त्रोत संकल्पना त्यास सहज अभ्यासायला मिळतात. त्यामुळे विद्यार्थ्यांची जिज्ञासा ही अधिक वाढली आहे आणि ती भागविण्यासाठी, ज्ञान मिळविण्यासाठी तो अधिक प्रयत्न करीत आहे.

**संदर्भ** = प्रश्नावली